# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३०/०५/२०१९
## दि.२९/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे २२९/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | अनिरुध्द जाधव,वय-३३ वर्षे,रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०५/२०१९ रोजी सकाळी ११/३० वा.ते १९/०० वा. चे दरम्यान लेन नं.८,शेजवळ पार्क, चंदननगर,पुणे येथे फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २,३४,५००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.पी.भोसले ९४२०७३३८५५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २१८/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | रमेश बनसोडे,वय-५६ वर्षे,रा.तळेगाव स्टेशन,ता.मावळ,जि.पुणे |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०१९ रोजी दुपारी १२/०० ते ०१/०० वा. चे दरम्यान काव्या जलतरण तलाव, खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा प्रतिक रमेश बनसोडे,वय-२६ वर्षे,रा.घर नं.६४,इंद्रायणी कॉलनी अथर्व पार्क,तळेगाव स्टेशन,ता.मावळ,जि.पुणे हा त्याचा मित्र सागर राजेश मेहता, रा. चंदन नगर,पुणे याचे सोबत काव्या जलतरण तलाव,खराडी,पुणे येथे गेला होता. प्रतिक बनसोडे यास पोहता येत नसतानादेखील त्याला तेथील जलतरण चालविणारे इसमांनी त्यास पाण्यात बुडण्यापासून वाचविण्यासाठी कोणतीही साधने उदा. फ्लोटर इत्यादि न पुरविल्याने प्रतिक हा पाण्यात बुडल्याने तो हात वर करुन जीव वाचविण्यासाठी प्रयत्न करीत असताना, सदर जलतरण तलावातील जीव रक्षक यांनी प्रतिक याचेकडे दुर्लक्ष करून निष्काळजी व हलगर्जीपणा केल्यामुळे प्रतिक याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. (फिर्यादी यांनी त्यांचे मुलाचा अंत्यविधी करुन आल्यानंतर तक्रार दाखल केली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एम.आठरे ८२७५२०१५२१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १६२/१९,भादविक ३२४,३२३,५०६,३४, अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक का.कलम ३(१)(आर)(एस),३(२)(व्हिए)अन्वये |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५० वर्षे,रा.घोरपडे पेठ,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०१९ रोजी १६/३० वा. जुनी जिल्हा परिषद,मंगळवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे एका विद्यालयात असलेल्या मुख्याध्यापक या पदाचे सेवाजेष्ठतेच्या निर्णयाचे सुनावणीकरीता मा.गट शिक्षणाधिकारी,माध्यमिक विभाग,जुनी जिल्हा परिषद, मंगळवार पेठ,पुणे यांचे कार्यालयात गेले असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस अपशब्द वापरून,तु हेड मास्तर पदाचा नाद करु नको असे अपमानास्पद बोलुन,त्यांना खाली पाडुन हाताने मारहाण करून,त्यांना ऑफीस मधुन बाहेर नेण्याचा प्रयत्न करुन, तुझा कायमचा काटा काढतो अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.आ. फरासखाना विभाग, श्री.प्रदिप आफळे ९८२३५०४७४७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १७९/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२४ वर्षे,रा.जनवाडी,गोखलेनगर,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०५/२०१९ रोजी १८/१४ ते १८/१९ वा. चे दरम्यान ए.टी.एम. स्वीच सेंटर,ए.टी.एम. कॅश सेंटर,कोरेगाव पार्क,पुणे व एसबीआय अेटीएम सेंटर,ढोले पाटील रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मैत्रीणीचे अकाऊंटवर पैसे ट्रान्स्फर करण्यासाठी एसबीआय अेटीएम सेंटर,ढोले-पाटील रोड,पुणे येथे गेले असता,सदर ठिकाणी हजर असलेले यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांना मदत करतो असे दाखवुन,हातचलाखीने त्यांचेकडील एसबीआय एटीएम कार्ड,सदर इसमाने त्याचेकडील असलेले दुसरे एटीएम कार्ड परस्पर बदलुन तेथुन निघुन गेला. त्यानंतर अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे एटीएम कार्ड मधुन कॅश विथड्रॉव्हल व कॅश ट्रान्स्फरव्दारे एकुण २२,५००/- रुपये काढुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.जी.शेंडगे ८८८८९०२९०२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४७३/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२१ वर्षे,धंदा-शिक्षण,रा.उंड्री,पुणे |
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै २०१८ पासुन ते आजपर्यंत फिर्यादी यांचे रहाते घरी वेळोवेळी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया इराण देशाच्या नागरिक असुन,त्या शिक्षणासाठी पुण्यात आल्या असुन, त्यांना व त्यांचे सहकारी यांना डी.वाय. पाटील कॉलेज फॉर्मसी,पिपरी,पुणे येथे डी.फार्मसी करीता ॲडमिशन घ्यायचे असल्याने,त्यांनी सदर इसम याचेशी त्यासंदर्भात चर्चा केली असता,त्याने फिर्यादीस तुम्हाला प्रवेश घेवुन देतो असे सांगुन,त्यांचेकडुन ४,५०,०००/- व फिर्यादीचा सहकारी यांचेकडुन ४,५०,०००/- असे एकुण ९,००,०००/- रुपये घेवुन,फिर्यादी यांना पैसे मिळालेबाबत रिसीट देवुन,तुम्हाला लवकरच प्रवेश घेवुन देतो असे सांगितले. परंतु त्यानंतर फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी सदर इसमास वेळोवेळी प्रवेशा बाबत विचारणा करता,त्याने फिर्यादी व साक्षीदार यांना प्रवेश मिळवुन न देता,दोघांचे घेतलेले पैसे त्यांना परत देण्यास नकार देवुन,सदर रकमेचा अपहार करून,फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.एच.पाडवी ९९२३६६००७४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**